असा. क्र. ४० रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर १०, २००७/अग्रहायण १९, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | ३०३-३०४ |


दिनांक ७ डिसेंबर २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १० डिसेंबर २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

सन १९६१ चा महा. २४. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ ऑगस्ट २००७ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २००७, हा प्रख्यापित केला होता ; (सन २००७ चा महा. अध्या. ६.)

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १८ ऑगस्ट २००७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या **कलम** ७३क मध्ये,— १९६१ चा महा. २४.

(क) पोट-कलम (५) वगळण्यात येईल ;

(ख) समासटीपेमधील " किंवा दहापेक्षा अधिक वर्षांसाठी त्याच संस्थेचे पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २००७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००७ चा महा. अध्या. ६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. ८२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर १०, २००७/अग्रहायण १९, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Act, 2007 (Mah. Act No. XXX of 2007), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXX OF 2007.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 10th December 2007).*

An Act further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

WHEREAS, both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS, the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Ordinance, 2007, on the 18th August 2007 ;

Mah. XXIV of 1961.
Mah. Ord. VI of 2007.



[किंमत : रुपये ९.००]

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Fifty-eighth Year of the Republic of India as follows:—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Act, 2007.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 18th August 2007.

Amendment of section 73-A of Mah. XXIV of 1961.

**2.** In section 73-A of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (hereinafter referred to as "the principal Act"),— Mah. XXIV of 1961.

(*a*) sub-section (*5*) shall be deleted;

(*b*) in the marginal note, the words "or for being designated officer of the same society for more than ten years" shall be deleted.

Repeal of Mah. Ord. VI of 2007 and saving.

**3.** (*1*) The Maharashtra Co-operative Societies (Amendment) Ordinance, 2007, is hereby repealed. Mah. Ord. VI of 2007.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken under the principal Act, as amended by this Act.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई